MHNS140017972025

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६५/२०२५
हिरामण दगु बत्तासे वि.
कोणीही नाही.

## निशाणी क्र. ०१ वरील आदेश
## (दिनांक १३ मार्च, २०२६)

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई विनियमन अधिनियम १८२७ (Bombay Regulation Act 1827) अन्वये दाखला (Heirship Certificate) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदार यांचे थोडक्यात कथन की,**

**०२.** मयत कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे अर्जदार हिरामण दगु बत्तासे हे मुलगा आहेत. मयत कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांना कै. शांताराम दगु बत्तासे (तेली) व अर्जदार हिरामण दगु बत्तासे अशी मुले होती. कै. भागीरथीबाई दगु बत्तासे हे दिनांक १४/०७/२००० रोजी मयत झालेले असुन कै. शांताराम दगु बत्तासे हे दिनांक २५/०७/१९८५ रोजी मयत झालेले आहेत. मयत कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे मृत्युपश्चात अर्जदार अर्जदार हेच कायदेशीर वारस असुन त्यांच्या शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**०३.** कै. भागीरथीबाई दगु बत्तासे व अर्जदार यांची मुले नामे मोहन हिरामण बत्ताासे व भगवान हिरामण बत्ताासे यांचे नावे तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तुालुका दिंडोरी नगरपंचायत दिंडोरी पैकी स्वतंत्र ग्रामपंचायत मौजे जालखेड या गावचे शिवारातील शेतमिळकत गट नं.१६५ यांसी भुधारणा पध्दती भोग वर्ग-१, यांसी एकुण क्षेत्र ०५ हे. ०२ अशी मिळकत असुन सदर मिळकत ही अर्जदार यांच्या मालकीची व

कब्जेवहिवाटीतील मिळकत होती व आहे. कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे मृत्युपश्चात वर नमुद शेतजमीनीस वारसा हक्काने अर्जदार यांची नावे लावण्यासाठी अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता आहे. सबब, अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०४.** मयत कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे मृत्यु पश्चात अर्जदार हे सरळ व कायदेशीर वारस आहेत किंवा काय याबाबत दिनांक १४/०१/२०२६ रोजीचे ''दैनिक गावकरी'' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस व जाहीरनामा (निशाणी क्र.७) प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आल्या. तथापि, कोणीही हरकती नोंदविल्या नाहीत.

**०५.** अर्जदार श्री. हिरामण दगु बत्तासे यांनी अर्जातील त्यांच्या कथनाचे पृष्ठ्यर्थ त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.८ वर दाखल केले आहे. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात अर्जातील सर्व कथनांचा पुनःरुच्चार केलेला आहे व अर्जदार हेच मयत कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नसल्याबाबत सत्य प्रतिज्ञेवर कथन केले आहे.

**०६.** अर्जदार यांनी त्यांच्या तोंडी पुराव्याचे पृष्ठ्यर्थ कागदोपत्री पुराव्यात मौजे जालखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील गट नं.१६५ चा ७/१२ उता-याची प्रत, मौजे जालखेडा, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील फेरफार नोंद नं.३७३ व ५२१ ची प्रत, कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत, कै. शांताराम दगू बत्तासे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत, सरपंच, ग्रामपंचायत जालखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांनी दिनांक १४/११/२०२५ रोजी दिलेला दाखला, अर्जदार यांचे आधारकार्डची साक्षांकित प्रत, अर्जदार यांचा मुलगा मोहन हिरामण बत्तासे व भगवान हिरामण बत्तासे यांचे आधारकार्डची साक्षांकित प्रत, अर्जदार व त्यांचा मुलगा मोहन यांचे रेशनकार्डची साक्षांकित प्रत ईत्यादी कागदपत्र दाखल केलेले आहेत. अर्जदार यांनी

निशाणी क्र.१३ वर पुरसिस दाखल करुन त्यांची पुराव्याची बाजु बंद केली.

**०७.** उपरोक्त लेखी व तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता तसेच प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसुन येते की, कै. भागीरथीबाई दगु बत्तासे हे दिनांक १४/०७/२००० रोजी मयत झालेले आहेत. दिनांक ११/०२/२०२६ रोजीचे ''दैनिक गावकरी'' वर्तमानपत्रात दिलेली जाहीर नोटीस व जाहीरनामा नोटीस (निशाणी क्र.७) प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आल्या. तथापि, अर्जदार यांचे लाभात वारस दाखला देण्याकरीता कोणीही हरकत नोंदविल्या नाहीत. सबब, कै. भागीरथीबाई दगु बत्तासे हे मयत झाल्यामुळे अर्जदार हे कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. करीता, अर्जदार यांच्या नावे वारस मान्यता प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यास अर्जदार पात्र आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे कै. भागीरथीबाई दगु बत्तासे यांचे मृत्युपश्चात अर्ज कलम १ मधील मिळकतीस कायदेशीर वारस आहेत असा दाखला (Heirship Certificate) नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन देण्यात यावे.

३. संचिका बंद करण्यात येते.

SHRUTI CHANDRAKANT NIRMALE

Digitally signed by SHRUTI CHANDRAKANT NIRMALE
Date: 2026.03.13 17:28:32 +0530

दिनांक १३/०३/२०२६

( एस. सी. निर्मळे)
दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
दिंडोरी.